नि.फौ.प्र.क्र.१६/२०२४
सरकार -वि.- जगन नारखेडे+१३
**निशाणी क्र. ३५०**

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्रमांक १७ याची जबानी</u>**

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,
नांव - प्रविण प्रकाश चौधरी,
वय - ४७ वर्षे, व्यवसाय – शेती,
रा. - नरवेल, ता. मलकापुर जि.बुलडाणा

**<u>सरतपास- सरकारी अभियोक्ता श्री.आर.बी. देवराज यांचेमार्फत शपथेवर सुरु....</u>**

०१. माझी शेती कोरवाड शिवरात असून ती ६ एकर आहे. सन २०२२-२३ मध्ये मी कापूस पेरला होता. तो कापूस ५१ क्वींटल २० किलो झाला होता. चिंचोडचे रमेश लाहूडकर यांनी तो कापूस नेला. त्यांनी तो कापूस सव्वा नऊ हजार प्रति क्वींटलच्या भावाने विकत घेतला. त्यांनी तो कापूस दुपारून नेल्यानंतर संध्याकाळी ५५ हजार रुपये मला दिले. अर्धे पैसे वीस दिवसाने देणार आहे व उर्वरित पैसे चाळीस दिवसांनी देणार आहे असे मला सांगितले. त्या कापसाचे पैसे मला भेटले नाही. त्यानंतर पोलीस स्टेशनला येवून बयाण दिले. मी रमेश भागवत लाहुडकर याला ओळखतो. त्याच्या गावाच्या शेजारी माझी शेती आहे. मी रमेश लाहुडकर याला ओळखतो. तो आज न्यायालयात हजर आहे. मी पोलीसांना जबाब देतेवेळी माझ्या शेताचा सातबारा दिला होता.

सरतपास पुर्ण.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.१ व ११ तर्फे विधीज्ञ श्री.आर.एस.जगताप याचंचेमार्फत सुरु....</u>**

०२. मी पोलीसांना तपासाकामी सन २०२२-२३ मध्ये कापूस पेरल्याबाबतचे वेगळे पेरेपत्रक दिले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, माझा जो व्यवहार झाला त्यामध्ये जगन नारखेडेशी कोणताही संबंध आला नाही.

उलटतपास पूर्ण.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.२ व ३ तर्फे विधीज्ञ श्री.तांदुळकर यांचेमार्फत सुरु....</u>**

०३. राजेंद्र पांडुरंग पाटील व शरद विष्णु बोरले यांचा माझ्याशी कोणताही व्यवहार झालेला नसून त्यांचा व माझा काहीही संबंध नाही.

उलटतपास पूर्ण.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.५ तर्फे विधीज्ञ श्रीमती एन.के.डोसे यांचेमार्फत सुरु....</u>**

०४. आरोपी क्र.१, २, ३ व ११ यांचा उलटतपास स्वीकृत करण्यात आला.

**उलटतपास- आरोपी क्र.६,७, ९ व १४ तर्फे विधीज्ञ श्री.जी.डी.पाटील यांचे मार्फत सुरु....**

०५. आरोपी क्र.१, २, ३ व ११ यांचा उलटतपास स्वीकृत करण्यात आला.

उलटतपास पूर्ण.

**उलटतपास- आरोपी क्र.८ तर्फे विधीज्ञ श्री.एन.एस.तायडे यांचेमार्फत सुरु....**

०६. आरोपी क्र.१, २, ३ व ११ यांचा उलटतपास स्वीकृत करण्यात आला.

**उलटतपास- आरोपी क्र.१० तर्फे विधीज्ञ श्री.एस.एस. मोरे यांचेमार्फत सुरु....**

०७. माझ्या शेताचा गट क्र.८८ होता. त्यात आम्ही पाच लोक मालक आहोत. इतर जे चार मालक आहेत त्यांची कोणतीही तक्रार नाही. माझे आरोपी रमेश लाहुडकरशी प्रत्यक्षात बोलणे झाले नव्हते. फोनवर बोलणे झाले होते. कापसाचे भाव फोनवरच ठरले. मी पंचवीस वर्षांपासून शेती करतो. हे मला माहीती आहे की, माल विकायचा राहिल्यास कृषी उत्पन्न बाजार समितीच्या यार्डमध्ये नोंद होते व तेथून टोकन घेवून ज्या व्यापा-याला माल द्यायचा आहे त्याला दिला जातो. सदर प्रकरणात मी कृषी उत्पन्न बाजार समितीत याप्रमाणे माल नेलेला नाही. मी ज्या माणसाला माल देत होतो. त्या माणसाकडे कृषी उत्पन्न बाजार समितीचा अधिकृत परवाना धारक आहे किंवा नाही हे सुध्दा मी पाहिले नाही. मी आरोपी रमेश लाहुडकर कृषी उत्पन्न बाजार समितीत काम करतो किंवा नाही याबाबत चौकशी केली नाही. मी रमेश लाहुडकर सोबत व्यवहाराबाबत कोणताही लेखी करारनामा केला नाही. मुदतीत पैसे न दिल्यास काय करायचे याबाबत काहीही ठरले नव्हते. त्यावेळी कापसाचे बाजार भाव सात हजार प्रति क्वींटल होता. मी कापसाच्या बाजार भावाबाबत असलेल्या तफावतीबाबत आरोपीकडे चौकशी केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, आजुबाजुच्या इतर लोकांनी कापूस दिला म्हणून मी पण कापूस दिला. कापूस न्यायला जी गाडी आली होती त्याचा क्रमांक मला सांगता येणार नाही. मला गाडी क्रमांक माहीत नव्हता व मी पोलीसांना देखील सांगितला नव्हता. माल देतेवेळी पहिले खाली गाडीचे वजन होते त्यानंतर त्यात माल भरल्यानंतर त्या गाडीचे परत वजन होते व परत त्यानंतर भरलेल्या गाडीच्या वजनातून खाली गाडीचे वजन कमी केले जाते व माल मोजला जात असल्याचे मला माहीत नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, तोलकाटयावरून घराच्या समोरून कापूस नेला. तोलकाटयावर कापूस मोजल्याबाबतची पावती माझ्याकडे नाही व तसेच मी घेतलेली नाही. साक्षीदार परत स्वतःहून

सांगतो की, आमचे प्रेमाचे संबंध होते. प्रेमाचे संबंध असल्यामुळे याआधी असे व्यवहार केलेले नाही.

०८. माझा माल २ ऑगस्टला नेला व मी तक्रार २० जानेवारीला केली. मी सदर व्यवहाराबाबत आरोपीला माझ्या वकीलांमार्फत कोणतीही नोटीस दिलेली नाही तसेच मी वेगळा दिवाणी दावा दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलीस माझ्याकडे चौकशीला आले म्हणून मी त्यांना बयाण दिले. हे म्हणणे खरे आहे की, जगन नारखेडे व इतर आरोपींविरुध्द गुन्हे दाखल केल्याची माहीती पेपर मध्ये आली. हे म्हणणे खरे आहे की, पेपरमध्ये आल्यानंतर अनेक शेतक-यांनी पोलीस स्टेशनला जावून तक्रारी मांडल्या. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीकडून पैसे काढण्याकरिता त्याचे नाव विचारपूर्वक तक्रारीमध्ये नमूद केले. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी रमेश लाहुडकरने प्रत्यक्षात कोणताही कापूस माझ्याकडून नेलेला नाही व तसा व्यवहार देखील झालेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या शेतात कापूस पेरल्याचे व तो कापूस ५१ क्वींटल झाल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण,

फेरतपास काही नाही.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.१३ तर्फे विधीज्ञ श्री.बी.एस.वानखेडे यांचेमार्फत सुरु....</u>**

०९. आरोपी क्र.१, २, ३ व ११ यांचा उलटतपास स्वीकृत करण्यात आला.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.१२ तर्फे विधीज्ञ श्रीमती आर.डी.संचेती यांचेमार्फत सुरु....</u>**

१०. आरोपी क्र.१, २, ३ व ११ यांचा उलटतपास स्वीकृत करण्यात आला.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.०४ तर्फे विधीज्ञ श्री.एस.एस.शेख यांचेमार्फत सुरु....</u>**

११. आरोपी क्र.१, २, ३ व ११ यांचा उलटतपास स्वीकृत करण्यात आला.

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by PARAG SATISH THAKARE
Date: 2025.12.17 16:28:08 +0530

दिनांक : १७/१२/२०२५.

**( पी.एस.ठाकरे )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र.१), मलकापूर